**नि.क्र.४३**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०५ चा जबाब</u>**

साक्षीदाराचे नावः– **बालाजी किशनराव जाधव,**

वयः– ४६ वर्षे, व्यवसायः– मजुरी,

राहणारः– हासोरी, **ता. निलंगा जिल्हा लातूर.**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सरकरी विधीज्ञ श्री. व्ही. एन. मेहेत्रे यांचेमार्फत शपथेवर सुरुः–</u>**

**०१.** फिर्यादी सतीश देशमाने यांना मी ओळखतो. ते पिगमी एजेंट होते. माझ्या शेताच्या जवळ ओढा आहे. सन २०१७ मध्ये आम्ही शेतात काम करत होतो. तेव्हा आम्हाला धडक बसल्याचा आवाज आला. तो अपघात कासासिरसी ते निलंगा जाणाऱ्या रोडवर आमच्या शेताच्या जवळ पुलाच्या पुढे झाला होता. तो अपघात दुपारी १.३० ते २.०० च्या दरम्यान झाला होता. तो अपघात मोटारसायकलचा झाला होता. त्या मोटारसायकलचे लाईट तुटले होते. चालक सतीश देशमाने याच्या डोक्याला दुखापत झाली होती. गावातून लोक आले. अपघातावेळी मी जाण्यापुर्वी लोक जमा झाले होते. आम्ही त्याला कासारसिरसी येथील डॉक्टर लोखंडे यांच्या दवाखान्यात नेले होते. अपघाताबाबत मी सतीशच्या घरी कळवले होते.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे अॅड एम.के.वलांडे यांच्यामार्फत सुरुः–</u>**

०२. तो अपघात कसा झाला हे मला माहीत नाही.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही**

**श्रवणोत्तर स्वीकृत.**

Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2026.06.09 17:46:30 +0530

**(श्रीमती.ए.एस.गुंजवटे)**

दिनांक ०९/०६/२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१,

निलंगा